भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# राष्ट्रीय मागासवर्ग आयोग अधिनियम, १९९३

(सन १९९३ चा अधिनियम क्रमांक २७)

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The National Commission for Backward Classes Act, 1993

**(Act No. 27 of 1993)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ४.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि नॅशनल कमिशन फॉर बॅकवर्ड क्लासेस ॲक्ट, १९९३ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ ३२ ते ३५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the National Commission for Backward Classes Act, 1993 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 32 to 35.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

एच ४१३०—१ (१०३५-१-२००४)

# राष्ट्रीय मागासवर्ग आयोग अधिनियम, १९९३

कलमांचा क्रम

## प्रकरण एक

### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

## प्रकरण दोन

### राष्ट्रीय मागासवर्ग आयोग

३. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची घटना.

४. अध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी आणि सेवाशर्ती.

५. आयोगाचे अधिकारी व अन्य कर्मचारी.

६. वेतन व भत्ते अनुदानातून देणे.

७. रिक्त पदे, इत्यादीमुळे आयोगाच्या कार्यवाही विधिबाह्य ठरणार नाहीत.

८. आयोगाने कार्यपद्धतीचे विनियमन करणे.

## प्रकरण तीन

### आयोगाची कार्ये आणि शक्ती

९. आयोगाची कार्ये.

१०. आयोगाची शक्ती.

११. केंद्र सरकारद्वारे यादींचे नियतकालिक पुनरीक्षण.

## प्रकरण चार

### वित्त व्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

१२. केंद्र सरकारकडून अनुदाने.

१३. लेखे व लेखापरीक्षा.

१४. वार्षिक अहवाल.

१५. वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षा अहवाल संसदेसमोर मांडणे.

## प्रकरण पाच

### संकीर्ण

१६. आयोगाचा अध्यक्ष, सदस्य व कर्मचारी वर्ग लोकसेवक असणे.

१७. नियम करण्याची शक्ती.

१८. अडचण दूर करण्याची शक्ती.

१९. निरसन आणि व्यावृत्ती.

# राष्ट्रीय मागासवर्ग आयोग अधिनियम, १९९३

(१९९३ चा अधिनियम क्रमांक २७)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[२ एप्रिल, १९९३]

**अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींव्यतिरिक्त इतर मागासवर्गांसाठी राष्ट्रीय मागासवर्ग आयोग घटित करण्याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा त्याला आनुषंगिक अशा बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येवो :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, "राष्ट्रीय मागासवर्ग आयोग अधिनियम, १९९३" असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) तो, १ फेब्रुवारी, १९९३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "मागासवर्ग" याचा अर्थ, केंद्र सरकार सूचीमध्ये विनिर्दिष्ट करील असे, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती व्यतिरिक्त असलेले मागासवर्गीय नागरिक, असा आहे ;

(ख) "आयोग" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेला राष्ट्रीय मागासवर्ग आयोग, असा आहे ;

(ग) "सूची" याचा अर्थ, भारत सरकारच्या सेवेमध्ये आणि भारताच्या राज्यक्षेत्रामधील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील कोणत्याही स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाच्या सेवेमध्ये भारत सरकारच्या मते, पुरेसे प्रतिनिधित्व नसलेल्या मागासवर्गीय नागरिकांसाठी नियुक्तीचे किंवा पदांचे आरक्षण करण्याची तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ, भारत सरकारद्वारे वेळोवेळी तयार केलेली सूची, असा आहे ;

(घ) "सदस्य" याचा अर्थ, आयोगाचा सदस्य असा असून त्यामध्ये अध्यक्षाचा समावेश होतो ;

(ङ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

## प्रकरण दोन

### राष्ट्रीय मागासवर्ग आयोग

३. (१) केंद्र सरकार, या अधिनियमान्वये प्रदान करण्यात येतील त्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि नेमून देण्यात येतील ती कार्ये पार पाडण्यासाठी, राष्ट्रीय मागासवर्ग आयोग म्हणून ओळखला जाणारा निकाय घटित करील. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची घटना.

(२) हा आयोग, केंद्र सरकारद्वारे नामनिर्देशित केलेल्या खालील सदस्यांचा मिळून बनलेला असेल :—

(क) जो सर्वोच्च न्यायालयाचा किंवा उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होता असा अध्यक्ष ;

(ख) समाजशास्त्र ;

(ग) ज्यांना मागासवर्गीयांशी संबंधित बाबींचे विशेष ज्ञान आहे अशा दोन व्यक्ती ; आणि

(घ) जो भारत सरकारच्या सचिव दर्जाचा केंद्र सरकारचा अधिकारी आहे किंवा होता असा सदस्य-सचिव.

४. (१) प्रत्येक सदस्याचा पदावधी, त्याने पद धारण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांसाठी असेल. अध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी आणि सेवाशर्ती.

(२) सदस्याला, स्वतःच्या सहीने आणि केंद्र सरकारला उद्देशून, अध्यक्षपदाचा, किंवा प्रकरण-परत्वे सदस्यत्वाचा कोणत्याही वेळी लेखी राजीनामा देता येईल.

(३) केंद्र सरकारला, एखाद्या व्यक्तीला, सदस्यपदावरून पुढील परिस्थितीत दूर करता येईल, ती व्यक्ती जर,—

(क) अविमुक्त नादार व्यक्ती असेल ;

(ख) केंद्र सरकारच्या मते जो नैतिक अध:पात ठरत असेल, अशा अपराधांसाठी सिद्धदोष ठरली असेल आणि तिला कारावासाची शिक्षा झाली असेल ;

(ग) विकलमन झाली असेल व सक्षम न्यायालयाकडून तसे घोषित झाले असेल ;

(घ) काम करण्याचे नाकारत असेल किंवा काम करण्यास असमर्थ झाली असेल ;

(ङ) आयोगाकडून, अनुपस्थित राहण्याची परवानगी घेतलेली नसतानाही आयोगाच्या तीन लागोपाठच्या बैठकींना अनुपस्थित असेल; किंवा

(च) केंद्र सरकारच्या मते, तिने अध्यक्षांच्या किंवा सदस्याच्या पदाचा अशा तऱ्हेने गैर-वापर केला असेल की, ज्यामुळे त्या व्यक्तीने त्या पदावर असण्याचे चालू राहणे हे मागासवर्गीयांच्या हिताच्या दृष्टीने, किंवा लोकहिताच्या दृष्टीने हानिकारक असेल :

परंतु, याबाबतीत कोणत्याही व्यक्तीला तिचे म्हणणे ऐकवण्याची संधी देण्यात आल्याशिवाय, त्या व्यक्तीला पदावरून दूर केले जाणार नाही.

(४) पोटकलम (२) अन्वये किंवा अन्यथा रिक्त झालेले पद नवीन नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येईल.

(५) अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या अन्य अटी व शर्ती, विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

आयोगाचे अधिकारी व अन्य कर्मचारी.

५. (१) केंद्र सरकार, आयोगाची कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकारी व कर्मचारी आयोगाला पुरवील.

(२) आयोगाच्या प्रयोजनासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती, विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

वेतन व भत्ते अनुदानातून देणे.

६. अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि कलम ५ मध्ये उल्लेखिलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते यांसह प्रशासनिक खर्च, कलम १२ च्या पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अनुदानातून भागवण्यात येईल.

रिक्त पदे, इत्यादींमुळे आयोगाच्या कार्यवाही विधिबाह्य ठरणार नाहीत.

७. कोणतेही पद रिक्त आहे किंवा आयोगाच्या घटनेत कोणतीही उणीव आहे, याच केवळ कारणावरून आयोगाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही विधिबाह्य ठरणार नाही.

आयोगाने कार्यपद्धतीचे विनियमन करणे.

८. (१) आयोगाची बैठक आवश्यकतेनुसार व आवश्यक वाटेल तेव्हा आणि अध्यक्षास योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी घेण्यात येईल.

(२) आयोग स्वत: आपल्या कार्यपद्धतीचे विनियमन करील.

(३) आयोगाच्या सर्व आदेशांचे व निर्णयांचे अधिप्रमाणन सदस्य-सचिवाकडून किंवा सदस्य-सचिवाने त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या आयोगाच्या अन्य एखाद्या अधिकाऱ्याकडून केले जाईल.

## प्रकरण तीन

### आयोगाची कार्ये आणि शक्ती

आयोगाची कार्ये.

९. (१) आयोग सूचीमध्ये नागरिकांच्या कोणत्याही वर्गाचा मागासवर्गीय म्हणून अंतर्भाव करण्याविषयीच्या विनंतींचे परीक्षण करील आणि अशा सूचीमध्ये कोणत्याही मागासवर्गाचा जास्त अंतर्भाव किंवा कमी अंतर्भाव झाल्याबद्दलच्या तक्रारींची सुनावणी करील आणि केंद्र सरकारला समुचित वाटेल असा सल्ला देईल.

(२) आयोगाचा सल्ला केंद्र शासनाला सामान्यपणे बंधनकारक राहील.

आयोगाची शक्ती.

१०. कलम ९ च्या पोटकलम (१) अन्वये कामे पार पाडताना, आयोगाला खटल्याची संपरीक्षा करण्यासाठी दिवाणी न्यायालयाला असतात त्या सर्व शक्ती आणि विशेषत: पुढील बाबींच्या संबंधातील शक्ती असतील :—

(क) भारताच्या कोणत्याही भागातील व्यक्तीला उपस्थित राहण्यासाठी समन्स पाठविणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे व त्याची शपथेवर तपासणी घेणे ;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचे प्रकटीकरण करून ते सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणत्याही शासकीय अभिलेखाची किंवा त्याच्या प्रतीची मागणी करणे;

(ङ) साक्षीदारांची व दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे ; आणि

(च) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**११.** (१) केंद्र सरकार जे मागासवर्ग राहिलेले नाहीत अशा वर्गांना सूचीतून वगळण्यासाठी किंवा अशा सूचीमध्ये नवीन मागासवर्गाचा अंतर्भाव करण्यासाठी त्या सूच्यांचे कोणत्याही वेळी आणि हा अधिनियम अंमलात आल्यापासून दहा वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर आणि त्यानंतर पुढील प्रत्येक दहा वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर पुनरीक्षण करील. केंद्र सरकारद्वारे यादींचे नियतकालिक पुनरीक्षण.

(२) केंद्र सरकार, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले कोणतेही पुनरीक्षणाचे काम हाती घेताना, आयोगाशी विचारविनिमय करील.

## प्रकरण चार

### वित्त व्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

**१२.** (१) केंद्र सरकार, संसदेकडून त्यासंबंधात कायद्याद्वारे रीतसर विनियोजन करण्यात आल्यानंतर आयोगाला, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ उपयोग करण्यासाठी केंद्र सरकारला योग्य वाटेल तेवढी रक्कम, अनुदानांच्या स्वरूपात देईल. केंद्र सरकारकडून अनुदाने.

(२) आयोग, या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटेल तेवढी रक्कम खर्च करील आणि अशी रक्कम, पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अनुदानातून देय असणारा खर्च म्हणून मानण्यात येईल.

**१३.** (१) आयोग, योग्य ते लेखे आणि इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि केंद्र सरकार, भारताचे नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून विहित करील अशा नमुन्यात लेख्यांचे वार्षिक विवरण तयार करील. लेखे व लेखापरीक्षा.

(२) आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा, नियंत्रक व महा लेखापरीक्षकाकडून, तो विनिर्दिष्ट करील अशा ठराविक कालांतराने करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात कोणताही खर्च करावा लागल्यास तो, आयोगाकडून नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांना देय असेल.

(३) नियंत्रक व महा लेखापरीक्षक आणि आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी या अधिनियमान्वये त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना नियंत्रक व महा लेखापरीक्षक याला शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात सर्वसाधारणत: जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात, तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार अशा लेखापरीक्षेच्या संबंधात असतील आणि विशेषत: पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याची मागणी करण्याचा व आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाचे निरीक्षण करण्याचा अधिकार असेल.

**१४.** आयोग, प्रत्येक वित्तीय वर्षासाठी विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा वेळी, आपला वार्षिक अहवाल तयार करील व त्यात मागील वित्तीय वर्षातील त्याच्या कार्याचा संपूर्ण तपशील देईल व त्याची एक प्रत केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल. वार्षिक अहवाल.

**१५.** केंद्र सरकार, वार्षिक अहवाल आणि त्यासोबत आयोगाने कलम ९ अन्वये दिलेल्या सल्ल्यानुसार करण्यात आलेल्या कारवाईचे ज्ञापन आणि अशा सल्ल्यांपैकी एखादा सल्ला अस्वीकृत केला असल्यास, त्याची कारणे आणि लेखापरीक्षा अहवाल, ते मिळाल्यावर शक्य तेवढ्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील. वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षा अहवाल संसदेसमोर मांडणे.

## प्रकरण पाच

### संकीर्ण

**१६.** आयोगाचा अध्यक्ष, सदस्य व कर्मचारीवर्ग हा, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. आयोगाचा अध्यक्ष, सदस्य व कर्मचारीवर्ग लोकसेवक असणे.

**१७.** केंद्र सरकारला या अधिनियमांचे उपबंध अंमलात आणण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांत पुढील-पैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील :—

(क) अध्यक्ष व सदस्य यांच्याबाबतीत कलम ४ च्या पोटकलम (५) अन्वये आणि अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबतीत कलम ५ च्या पोटकलम (२) अन्वये देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती ;

(ख) कलम १३ च्या पोटकलम (१) अन्वये तयार करावयाचे वार्षिक लेखा विवरणपत्र ज्या नमुन्यात ठेवावयाचे तो नमुना ;

(ग) कलम १४ खालील वार्षिक अहवाल ज्या नमुन्यात व ज्यावेळी तयार करावयाचा तो नमुना व ती वेळ ;

(घ) विहित करणे आवश्यक असलेली किंवा विहित करण्यात येईल अशी, इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल, किंवा यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

अडचण दूर करण्याची शक्ती.

१८. (१) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणताना जर कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकार शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील असे आणि ती अडचण दूर करण्यासाठी त्याच्या मते आवश्यक किंवा इष्ट असतील असे उपबंध करू शकेल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर असा कोणताही आदेश दिला जाणार नाही.

(२) या कलमान्वये केलेला प्रत्येक आदेश, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवला जाईल.

निरसन आणि व्यावृत्ती.

१९. (१) राष्ट्रीय मागासवर्ग आयोग अध्यादेश, १९९३ (१९९३ चा अध्यादेश २३) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई